ISSN 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 8 | September - 2016

Indian Streams Research Journal

# महिला स्वयंसहाय्यता बचत गट उत्पादनांचे विपणन

डॉ. बी.बी. शितोळे
सहयोगी प्राध्यापक , कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर

## प्रस्तावना :

ग्रामीण भारताच्या आर्थिक आणि सामाजिक विकासातील एक महत्वाचे पाऊल म्हणजे स्वयंसहाय्यता बचत गट मोहिम होय. ग्रामीण भागातील दारिद्र निर्मूलन, रोजगार व स्वयंरोजगार निर्मिती, महिला सक्षमीकरण, दुर्बल घटकांचे उन्नतीकरण इत्यादी प्रमुख विषयाच्या दृष्टीने बचत गट महत्वपूर्ण भूमिका करत आहेत आपल्या देशामध्ये १९९१ नंतर बचत गट मोहिमेस प्रारंभ झाला. परंतु खऱ्या अर्थाने ई.स. १९९२-९३ मध्ये नाबार्ड आणि भारतीय रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार बचत गट बँकांना जोडण्याची प्रक्रिया सुरु झाली परिणामी ग्रामीण भागातील लोकांना बचतीची सवय लावण्यात बचत गट यशस्वी होऊ लागले. आज



संपूर्ण देशात १० कोटी लोक बचत गटामध्ये सामावून घेतले गेले आहेत. यामध्ये पुरुष आणि महिला गटांचा समावेश असला तरी ९० टक्के बचत गट हे महिलांचे बचत गट आहेत.

महिला सक्षमीकरण आणि ग्रामीण महिलांचे स्वावलंबन या प्रमुख हेतूने अनेक महिला बचत गट आर्थिक बचती बरोबरच व्यापार आणि उद्योग क्षेत्रात कार्यरत आहेत. यामध्ये मुख्यत्वे पापड, लोणचे, मसाले, चकली, शेंगदाणा लाडू, खोबरा बर्फी, वेफर्स, राजगिरा लाडू, कुरडई, शेवई इत्यादी उत्पादनाबरोबरच फळ प्रकिया, मोरंबा, आवळा कँडी, आवळा पावडर, आंबा पोळी, फणस पोळी,इत्यादी विभिन्न ५० हून अधिक उत्पादने महिला बचत गटामार्फत घेतली जातात. उत्पादनासाठी आवश्यक कच्चा माल, बचत गटाद्वारे उपलब्ध भांडवल आणि यंत्र सामग्रीची उपलब्धता यामुळे उत्पादन करणे सहज शक्य झाले आहे. परंतु सदर उतपादानास मागणी मिळविणे, विपनानाची संधी शोधणे, जाहिरात करणे, संवेष्टन आणि बांधणी, बोधचिन्ह, व्यापारी चिन्ह, वाहतूक सुविधा इत्यादी समस्यांना बचत गटांना सामोरे जावे लागते. एकूणच परिणामकारक विपणन प्रक्रिया पार पडता येत नाही. त्यामुळे गुणवत्ता आणूनही अनेक उत्पादनांची विक्री होत नाही परिणामी बचत गटांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागते.

प्रस्तुत शोध निबंधात स्वयंसहाय्यता बचत गटाद्वारे उत्पादीत होणाऱ्या वस्तूंना असणाऱ्या विपणनाच्या संधी आणि विपणन प्रक्रियेमध्ये येणाऱ्या विविध समस्यांवर प्रकाश टाकण्यात आला आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे :

**प्रस्तुत शोध निबंधाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.**

**१. महिला स्वयंसहाय्यता बचत गटांच्या उत्पादनासाठी उपलब्ध विपणन संधींचा अभ्यास करणे.**

**२. बचत गट उत्पादनांच्या विपणन समस्यांची माहिती घेणे.**

**३. बचत उत्पादन विपणन समस्यांचे विश्लेषण करणे.**

**४. महिला स्वयंसहाय्यता बचत गट उत्पादनांच्या परिणामकारक विपणनासाठी उपयुक्त उपाययोजना सुचविणे.**

## संशोधन पद्धती :

**प्रस्तुत संशोधन अभ्यास प्राथमिक आणि दुय्यम अशा दोन्ही माहितीच्या आधारे करण्यात आला असून प्राथमिक माहितीचे संकलन सोलापूर जिल्हयातील ५ उत्पादक महिला स्वयंसहाय्यता बचत गटांना प्रत्यक्ष भेटून त्याचप्रमाणे विविध प्रदर्शनातील बचत गटाच्या विक्री दालनांना भेटी देऊन करण्यात आले आहे. दुय्यम स्वरुपाची माहिती तज्ञांच्या प्रकाशित मुलाखती, संदर्भ ग्रंथ, नियतकालिकामधील लेख इत्यादी माध्यमातून मिळविली आहे.**

## बचत गटांचे महत्व :

**ग्रामीण भागाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासामध्ये बचत गटांना अनन्यसाधारण महत्व असून ग्रामीण भागामध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, महिलांचे सक्षमीकरण करणे, अल्पसंख्याकाचे सामाजिक व आर्थिक उन्नतीकरण करणे, ग्रामीण भागामध्ये हुंडा विरोधी आणि दारूबंदी विषयी चळवळ उभी करणे यामध्ये महिला बचत गट महत्वपूर्ण भूमिका करत आहेत देशाच्या ग्रामीण भागात महिलांच्या उपक्रमशीलतेचे रुपांतर महिला उद्योजकांमध्ये व्हावे या हेतूने आर्थिक आणि तांत्रिक पाठबळ देण्यामध्ये बचत गटांचे योगदान मोठे असल्याचे पहावयास मिळते. सोलापूर जिल्हा या संशोधन क्षेत्रात सर्व ११ तालुक्यात विवध प्रकारचे बचत गट असून उद्योग क्षेत्रात माढा, मोहोळ, बार्शी व पंढरपूर या तालुक्यात महिला बचत गटाद्वारे विविध प्रकारच्या वस्तुंचे उत्पादन केले जाते. त्यामुळे अनेक ग्रामीण महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. महिला स्वावलंबी होत आहेत, त्यांचा आत्मविश्वास वाढत आहे, आणि त्यांच्या नेतृत्व गुणांमाध्येही वाढ करण्यात महिला बचत गटाचे योगदान मोठे आहे.**

## महिला स्वयंसहाय्यता बचत गटाच्या उत्पादनाच्या विपणनातील समस्या :

**स्वयंसहाय्यता बचत गटाद्वारे उत्पादन केलेल्या वस्तूंना स्थानिक बाजारपेठ, आठवडा बाजार, तालुका बाजार, छोट्या शहरातील किरकोळ व्यापारी, मॉल्स, याद्वारे विक्री व विपणाच्या संधी उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे अनेक बचत गट विविध प्रकारची प्रदर्शने, जत्रा , यात्रा याठिकाणी विक्रीचे स्टॉल्स उभे करून वस्तूची विक्री करतात. ही विपणन प्रक्रिया प्रभावीपणे करता यावी व फायदेशीर ठरावी अशी प्रत्येक बचत गटाची अपेक्षा असते. परंतु परिणाम कारक विपणन प्रक्रियेच्या**

दृष्टीने बचत गटांना अनेक अडथळे येतात एक प्रकारे विविध समस्यांना सामोरे जावे लागते. त्यापुढील प्रमाणे होत.

१. संवाद कौशल्याचा अभाव : ग्रामीण महिलांवरील कौटंबिक बंधने, अपुरे शिक्षण आणि सार्वजनिक जीवनातील कमी अनुभव यामुळे त्यांच्यात संवाद कौशल्याचा अभाव असतो. परिणामी उत्पादन गुणवत्तापूर्ण असताना त्या बद्दलची माहिती प्रभावीपणे मांडता येत नाही.
२. वाहतुक साधनांची कमतरता : उत्पादित माल स्थानिक बाजारपेठ, तालुका बाजारपेठ, आठवडी बाजार, प्रदर्शन स्थळे इ. पर्यंत घेऊन जाण्यासाठी स्वत:च्या मालकीचे वाहतुक व्यवस्था नसते. खाजगी वाहतुक व्यवस्था, महागडी आणि बेभरवशी असते. त्याचप्रमाणे सार्वजनीक वाहतूक व्यवस्था योग्य वेही उपलब्ध होत नाही. उत्पादित माल बाजारपेठेपर्यंत पोहचवीत असताना अडचणी येतात.
३. जाहिरीतीचा अभाव : आधुनिक वितरण प्रक्रियेतील प्रमुख घटक म्हणजे जाहिरात होय. जाहिरातीची साधने महागडी असतात. जाहिरातीबद्दल महिला उद्योजकांना माहिती नसते त्यामुळे वस्तूंबद्दल आवश्यक तो संदेश संभाव्य ग्राहकांपर्यंत पोहचू शकत नाही.
४. बोधचिन्ह, व्यापारी चिन्ह, बांधणी इ. बाबत जाणीव जागृती नाही त्यामुळे बाजारपेठेत उपलब्ध असलेल्या इतर उत्पादनाच्या तुलनेत बचत गटांची उत्पादने उत्कृष्ट असूनही मागणी कमी राहते.
५. मोक्याच्या ठिकाणी जागा मिळत नाही. यामुळे अनेक स्वयंसहाय्यता महिला बचत गटांची वस्तूंची विक्री करताना कुचंबना होते.

## निष्कर्ष :

ग्रामीण भारताच्या सामाजिक आणि आर्थिक विकासामध्ये महिला स्वयंसहाय्यता बचत गटांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरत असून ग्रामीण भागातील महिलांमध्ये आत्मविश्वासाबरोबरच नेतृत्वगुण विकसित होत आहेत. ग्रामीण भागामध्ये रोजगार आणि स्वयंरोजगाच्या संधी निर्माण करून महिलांचे सक्षमीकरण करण्यामध्ये आणि महिला स्वावलंबी होण्यामध्ये आज बचत गटांचे मोठे योगदान आहे. अनेक महिला बचत गट आर्थिक भूमिका करत असताना व्यापार आणि उद्योग क्षेत्रात कार्यरत आहेत. विभिन्न प्रकारच्या दैनंदिन गरजा भागविणाऱ्या वस्तूंचे उत्पादन करत आहेत. या गुणवत्तापूर्ण वस्तूंचे विपणन करण्यासाठी आवश्यक त्या पायाभूत सविधा आणि प्रेरणा मिळाल्यास स्वयंसहाय्यता बचत गट अधिक जोमाने कार्यरत राहतील यात शंका नाही.

## उपाय योजना :

संशोधन अभ्यासादरम्यान केलेल्या निरिक्षणाच्या आधारे परिणामकारक विपणनासाठी खालील उपाय योजना सुचविलेल्या आहेत.

१. महिलांमध्ये संवाद कौशल्य वाढावे यासाठी तालुकास्तरावर प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यात यावे.

२. जाहिरातीसाठी बसस्थानके, रेल्वे स्टेशन, धार्मिक स्थळे, गर्दीची ठिकाणे सहजपणे व सवलतीच्या दरात उपलब्ध व्हावीत
३. स्वयंसहाय्यता महिला बचत गटामध्ये वस्तूंच्या गुणवत्तेबाबत आणि बांधणी बाबत सतत जाणीव जागृती असावी.
४. प्रदर्शने भरविण्यासाठी शासनाच्या मोहिमा व योजना असाव्यात.
५. विपणन प्रक्रियेबात सखोल प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

## संदर्भसूची :


1. A. Abdul Raheem, 2011, Self Help Group and Women Empowerment, Engram Short Title Publication
2. B.K.Singh, 2007, Self Help Group and Women Empowerment, Adhyayan Publications and Distributors
3. एम. यु. मुलाणी , २००७, महिला स्वयंसहाय्यत बचत गट, डायमंड पब्लिकेशन
4. ॲग्रोवन - मराइ दैनिक विविध अंक
5. Shodhganga.inflibnet.ac.in
6. Youtube- doordarshansahyadri- 17July 2015